**विशेष दिवाणी दावा क्र. ४०/२०१८**

**CNR No. MHSO060007402018**

संतोष पाटील – पुजारी वगैरे

वि.

पुरुषोत्तम पाटील – पुजारी वगैरे

## आदेश निशाणी क्र. ६७ वर

दावा मिळकतपैकी काही क्षेत्र रत्नागिरी–सोलापूर रस्त्याच्या रुंदीकरणासाठी संपादीत होत आहे. दावा मिळकतमधून उजनी कालवा गेलेला आहे. सदर संपादनाचा मोबदला उपविभागीय अधिकारी, उजनी कालवा, उपविभाग, मंगळवेढा यांचेकडे जमा आहे. आता दावा मिळकतला ७/१२ उता–यावर प्रतिवादी क्र. ५ व ८ यांचे नाव आहे. त्याचा गैरवापर करुन उपविभागीय अधिकारी, उजनी कालवा, उपविभाग, मंगळवेढा यांनी संपादनाच्या मोबदल्याची रक्कम प्रतिवादी क्र. ५ व ८ यांना या दाव्याच्या अंतिम निर्णय होईपर्यंत देऊ नये यासाठी हा अर्ज देण्यात आलेला आहे.

०२. वादी तसेच प्रतिवादी क्र. २ ते ५ व ८ यांचे वकील यांचा युक्तिवाद ऐकला. वादी व प्रतिवादी यांची कथने तसेच रेकॉर्डवरील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. या अर्जाच्या अंतिम व योग्य निर्णयासाठी मी पुढीलप्रमाणे मुद्दे निश्चित केले. त्यावरील माझे उत्तर मी पुढील कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

| | मुददे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | वादी यांना प्रथमदर्शनी केस आहे काय ? | ... | नाही. |
| २. | न्यायाचा समतोल वादी यांच्या बाजूने आहे काय ? | ... | नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | नमूद तुर्तातुर्त मनाई न दिल्यास वादी यांचे अपरिमित नुकसान होईल काय ? | ... | नाही. |
| ४. | अंतिम आदेश कोणता ? | ... | अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. |

## **कारण मिमांसा**

**मुद्दा क्र. १ बाबत**

०३. विवाद्य मिळकती या वादी यांच्या वडिलांची आई चंद्रभागा पाटील (गुरव) यांच्या माहेरुन मिळालेली स्वसंपादीत मालकी वहिवाटीच्या आहेत. प्रतिवादी क्र. १ पुरुषोत्तम हे वादी यांचे सख्खे चुलत भाऊ आहेत. चंद्रभागा पाटील (गुरव) यांचे वादी क्र. १ व २ आणि प्रतिवादी क्र. १ हे नातू आहेत. नैसर्गिक प्रेम व वात्सल्यापोटी चंद्रभागा पाटील (गुरव) यांनी दावा मिळकत वादी क्र. १ व २ आणि प्रतिवादी क्र. १ यांना दिनांक ३०/०३/१९८४ रोजीच्या रजिस्टर्ड मृत्यु पत्राआधारे दिलेली आहे. सन १९८४ साली वादी हे अज्ञान होते. त्यामुळे त्यांना मृत्युपत्राबाबत माहिती नव्हती. जून २०१६ मध्ये मृत्युपत्राची नक्कल व माहिती मिळाल्यानंतर वादी व प्रतिवादी क्र. १ हे दावा मिळकतचे मृत्युपत्राआधारे मालक व वहिवाटदार आहेत असे जाहीर होऊन मिळणेसाठी हा दावा दाखल करण्यात आलेला आहे.

०४. दिनांक १५/०१/१९८८ रोजी चंद्रभागा पाटील (गुरव) या मयत झाल्या. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी संगनमताने फेरफार क्र. ११८५ प्रमाणे त्यांच्या स्वतःच्या नावाची नोंद दावा मिळकतला करुन घेतली. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ यांनी दावा मिळकतपैकी मिळकत क्र. १(ब) प्रतिवादी क्र. ४ यांना दिनांक १६/०४/१९९४ रोजी, प्रतिवादी क्र. ४ यांनी ती मिळकत प्रतिवादी क्र. ५ यांना दिनांक १२/०५/१९९५ रोजी विक्री केली. तसेच प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी दावा

कलम १(अ) मध्ये नमूद मिळकतपैकी क्षेत्र १ हे. ३८ आर. हे अनाधिकाराने गट विभाजन फेरफार क्र. ११८५ प्रमाणे घेतलेले आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी नमूद मिळकत दिनांक ०६/०९/१९९४ रोजी प्रतिवादी क्र. ६ यांना, त्यानंतर प्रतिवादी क्र. ६ यांनी दिनांक ०९/०८/२००० रोजी तीच मिळकत प्रतिवादी क्र. ७ यांना व नंतर प्रतिवादी क्र. ७ यांनी नमूद मिळकत दिनांक २२/०७/२००३ रोजी प्रतिवादी क्र. ८ यांना विक्री केलेली आहे. वादी क्र. १ व २ आणि प्रतिवादी क्र. १ हे दिनांक ३०/०३/१९९४ रोजीचे मृत्युपत्राचे आधारे मालक आहेत. आता दावा मिळकतला प्रतिवादी क्र. ५ व ८ यांचे नाव लागलेले आहे. ती सर्व खरेदीखते बेकायदेशीर आहेत असे वादी यांचे कथन आहे.

०५. वादी क्र. १ व २ यांनी दावा कलम १ मध्ये त्यांचे वय ४० व ४५ वर्ष असे दर्शवलेले आहे. म्हणजे वादी क्र. १ हे सन १९९४ तर वादी क्र. २ हे सन १९८९ मध्ये सज्ञान झाले असे म्हणता येईल. परंतु सदर दावा हा सन २०१६ मध्ये दाखल केलेला आहे. वादी याचे कथनानुसार त्यांना मृत्युपत्राबाबतची माहिती जून २०१६ मध्ये समजली आहे.

०६. प्रतिवादी यांचे वकिलांनी माझे लक्ष फेरफार क्र. १४८० च्या प्रतीकडे वेधले. त्यानुसार वादी क्र. १ संतोष यांनी दिनांक २०/०८/१९९६ रोजी अर्ज देऊन दिनांक ३०/०३/१९८४ रोजीचे मृत्युपत्राचे आधारे दावा मिळकतला वादी क्र. १ व २ आणि प्रतिवादी क्र. १ यांची नावे दाखल करावी असा अर्ज दिला होता. परंतु वादी यांनी चंद्रभागा पाटील (गुरव) यांचे मृत्युचा दाखला हजर केला नाही त्यामुळे दिनांक ३०/०१/१९९७ रोजी सदर फेरफारची नोंद ही रद्द करण्यात आलेली आहे.

०७. त्याअगोदर वादी यांनी परस्पर सहमतीने दिनांक ०७/०६/१९९३ रोजी दावा मिळकतचे गट विभाजन करुन घेतलेले आहे. त्यानुसार फेरफार क्र. ११८५ मंजूर

झालेला आहे. यावरुन प्रथमदर्शनी मृत्यु पत्राबाबतची माहिती वादी यांना जून २०१६ मध्ये झाली या कथनावर प्रथमदर्शनी विश्वास ठेवणे सहज शक्य वाटत नाही.

०८. दरम्यान प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दावा मिळकतची विक्री केलेली आहे. वेळोवेळी दावा मिळकत विक्री होऊन देखील वादी यांनी त्याबाबत कोणताही आक्षेप नोंदवलेला नाही. आता दावा मिळकत ही प्रतिवादी क्र. ५ व प्रतिवादी क्र. ८ यांच्या नावावर आहे. त्याप्रमाणे दावा मिळकतपैकी किती क्षेत्राचे कधी संपादन झालेले आहे याबाबतची कोणतेही स्पष्ट कथन वादी यांनी केलेले नाही. प्रतिवादी क्र. ५ व ८ हे दावा मिळकतचे बोनाफाईड पर्चेसर फॉर व्हॅल्यु विदाऊट नोटीस आहेत असे प्रतिवादी यांचे कथन आहे. दावा मिळकत प्रतिवादी क्र. ५ यांनी दिनांक १२/०५/१९९५ रोजी तर प्रतिवादी क्र. ८ यांनी दिनांक २५/०७/२००३ रोजी खरेदी घेतलेली आहे. तेव्हापासून दावा मिळकतला त्यांचे नाव दाखल झालेले आहे. त्यामुळे आता जर दावा मिळकतपैकी काही भाग संपादन झालेला असेल तर त्याबाबत मोबदला मिळवण्यापासून प्रतिवादी क्र. ५ व ८ यांना दाव्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत वंचीत ठेवणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होणार नाही. सबब वादी यांना प्रथमदर्शनी केस नाही असा निष्कर्ष मी नोंदवत आहे. त्यानुसार मी मुद्दा क्र. १ चे उत्तर 'नकारार्थी' देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबत</u>** –

०९. दिनांक ३०/०३/१९८४ रोजीचे मृत्युपत्राचे आधारे मालक असलेबाबतची मागणी वादी यांनी सर्वप्रथम सन २०१६ मध्ये या दाव्याचे आधारे केलेली आहे. यापुर्वी वादी संतोष यांनी दिनांक २०/०८/१९९६ रोजी त्याप्रमाणे नोंद घेण्यासाठी अर्ज तहसीलदार, मंगळवेढा यांचेकडे दिला होता. त्यानुसार कच्चा फेरफार क्र. १४८० घेण्यात आला. परंतु चंद्रभागा पाटील (गुरव) यांचे मृत्युचा दाखला हजर न केल्यामुळे दिनांक ३०/०१/१९९७ रोजी सदर नोंद ही रद्द करण्यात आलेली आहे. यावरुन वादी यांना मृत्युपत्राची माहिती पुर्वीच होती असे दिसून येते.

१०. तसेच आपसात संमतीने वादी व प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी फेरफार क्र. ११८५ प्रमाणे दावा मिळकतचे वाटप दिनांक ०७/०६/१९९५ रोजी केलेले आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दावा मिळकतची विक्री केली. त्याचे बरेचसे व्यवहार झाले. आता दावा मिळकतचे खरेदीदार हे प्रतिवादी क्र. ५ हे दिनांक १२/०५/१९९५ रोजी तर प्रतिवादी क्र. ८ हे दिनांक २२/०७/२००३ रोजी झालेले आहेत. त्यामुळे संपादनासाठी असलेला मोबदला मिळवण्याचा हक्क आता इतक्या उशिरा वादी यांचेसाठी राखून ठेवणे योग्य होणार नाही. सबब न्यायाचा समतोल हा वादी यांचे बाजुने नाही. तो प्रतिवादी क्र. ५ व ८ यांचे बाजुने आहे असे मी नमूद करतो. त्यानुसार मुददा क्र. २ चे उत्तर मी 'नकारार्थी' देतो.

**<u>मुद्दा क्र. ३ बाबत</u>** –

११. दावा मिळकतपैकी संपादीत जमिनीचा मोबदला उपविभागीय अधिकारी, उजनी कालवा उपविभाग, मंगळवेढा यांचेकडे जमा आहे. सदर मोबदल्याची रक्कम या दाव्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत कोणासही न देता तशीच ठेवणे न्यायाचे दृष्टीने योग्य होणार नाही. जर वादी यांना दाव्यामध्ये यश मिळाले तर सदर रकमेची मागणी ते प्रतिवादी क्र. ५ व ८ यांचेकडे करु शकतात. त्यामुळे जर तुर्तातुर्त मनाई हुकूम दिला नाही तर वादी यांचे कोणतेही अपरिमीत नुकसान होणार नाही असे मी नमूद करतो. त्यानुसार मी मुददा क्र. ३ चे उत्तर मी 'नकारार्थी' देतो.

**<u>मुद्दा क्र. ४ बाबत</u>** –

१२. मुददा क्र. १ ते ३ च्या नकारार्थी उत्तरानुसार वादी यांना प्रथमदर्शनी केस नाही. न्यायाचा समतोल वादी यांच्या बाजूने नाही. तसेच जर नमूद तुर्तातुर्त मनाई हुकूम

दिला नाही तर वादी यांचे अपरिमीत नुकसान होणार नाही असे निष्कर्ष मी नोंदवलेले आहेत. त्यामुळे मुददा क्र. ४ च्या उत्तरासाठी मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आ दे श

१. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. या अर्जाचा खर्च अंतिम निर्णयाचे वेळी विचारात घेतला जाईल.

३. खुल्या न्यायालयात आदेश जाहीर केला.

स्वाक्षरी/–

दि. १७/०३/२०२१

( श्रीकृष्ण हरीभाऊ इनामदार )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | A. S. Bavikar |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D., Pandharpur |
| Order signed by the P. O. on | : | 17/03/2021 |
| Order uploaded on | : | 18/03/2021 |